| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९६ वा | मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटाकडून भरला उपसभापतीपदाचा अर्ज !




**मुंबई/प्रतिनिधी:** विधान परिषद उपसभापतीपदासाठी ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार सचिन अहिर यांना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे आता पुन्हा एकदा ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. विधान परिषदेतील उपसभापतीपदासाठी सचिन अहिर अर्ज भरताना मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्री चंद्रकांत पाटील, मनिषा कायंदे, नीलम गोऱ्हे देखील उपस्थित होते.

सचिन अहिर यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने आदित्य ठाकरे यांना सर्वांत मोठा फटका बसल्याचे बोलले जात आहे. कारण आदित्य ठाकरे यांच्या वरळी मतदारसंघात विधान परिषदेचे दोन आमदार होते. वरळी विधानसभा मतदासंघात सचिन अहिर यांची वेगळी ताकद आहे.

**अहिरांना न्याय देण्याचा प्रयत्न– शिरसाट**

यावर बोलताना शिंदे सेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले की, सचिन अहिर हे शिवसेनेचे आमदार आहेत त्यांनी शिवसेनेतच प्रवेश केला आहे. आम्ही शिवसैनकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतदारसंघात कोणीतरी अतिक्रमण केले त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला तो दूर करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, सविन अहिर त्यांनी पक्ष सोडलेला नाही. ते ज्या चिन्हावर निवडून आले आहेत, त्या पक्षाचा त्यांनी पूर्वी अर्ज भरला होता त्याच पक्षात आले आहेत. ते मुळ शिवसैनिक आहेत त्यांच्यावर कारवाई होऊ शकत नाही. तर नरेश म्हस्के म्हणाले की, सचिन अहिर आमच्या पक्षात आले त्यांचे आम्ही स्वागत करतो.

**आम्ही ऑपरेशन करण्याच्या मानसिकतेमध्ये नाही**

संजय शिरसाट म्हणाले की, सचिन अहिर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आम्ही सर्वच जण उपस्थित होतो. एकनाथ शिंदे यांनी उबाठाचे आणखी एक ऑपरेशन केले आणि सचिन अहिर यांना उमेदवारी दिली. याला उबाठाचे नेते काय नाव देता याकडे आमचे लक्ष आहे. आम्ही ऑपरेशन करत नाही, पण लोकांची मानसिकता त्यांच्यासोबत राहण्याची राहिलेली नाही. त्यांना दाबण्यात आल्याने त्यांनी आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला. उबाठा आता अहिर यांच्यावर काय टीका करतात हे पाहणं महत्त्वाचे आहे. वरळीमध्ये येऊन दाखवा म्हणणारे यापुढे वरळीत येणार नाही. २०२९ मध्ये काय होते हे पहा म्हणत संजय शिरसाट यांनी आदित्य ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

**कोण आहेत सचिन अहिर?**

सचिन अहिर यांचे नेतृत्व कामगार चळवळीतून घडले. त्यांनी सामाजिक क्षेत्रातून राजकारणात प्रवेश केला. पहिल्यांदा १९९९ मध्ये ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर लढले. शिवडी मतरासंघातून ते आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर २००४, २००९ मध्येही ते आमदार म्हणून निवडून आले. महाविकास आघाडी सरकारमध्ये २००९ मध्ये त्यांनी गृहनिर्माण राज्यमंत्री पद भूषविले. मात्र, २०१९ च्या ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम ठोकत शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्या विजयात त्यांचा वाटा मोलाचा ठरला. शिवसेनेत झालेल्या फाटाफुटीनंतर ते उद्धव ठाकरेंसोबत राहिले होते. मात्र, आता ऐन विधिमंडळ अधिवेशनात त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत उडी घेत थेट विधान परिषद उपसभापतीपदाची उमेदवारी दाखल केल्याने खळबळ उडाली आहे. आदित्य ठाकरे सोडून सर्व आमदार आमच्यासोबत येतील असे शिरसाट यांनी म्हटले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाकडून आसाराम बापूला मोठा धक्का



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने, आसाराम बापूला तात्काळ जामीन मंजूर केला जाऊ शकत नाही. कारण न्यायालय प्रथम राजस्थान सरकारची बाजू ऐकून घेण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधी राजस्थान सरकारला नोटीस बजावली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत, आम्ही सध्या आसारामला जामीन देऊ शकत नाही. आम्हाला प्रथम राजस्थान सरकारची बाजू ऐकावी लागेल. आसाराम एका प्रभावशाली पदावर आहे; जामीन अर्जावर सुनावणी करताना आम्हाला याचाही विचार करावा लागेल. असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापूचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

**सर्वोच्च न्यायालयाने आसारामची विनंती फेटाळली**

आसारामच्या याचिकेवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने त्याची शिक्षा स्थगित करण्यास नकार दिला. खंडपीठाने निर्देश दिले की, याचिकाकर्त्याच्या वैद्यकीय सेवा तुरुंगात सुरू ठेवाव्यात. केवळ गंभीर आरोग्य स्थिती असल्यास जामिनाचा विचार केला जाईल असेही न्यायालयाने आपल्या आजच्या सुनावणीत म्हटले आहे.

**आरोग्याच्या कारणास्तव जामिनाची मागणी करण्यात आली होती**

न्यायमूर्ती सुंदरेश म्हणाले, आम्ही शिक्षा स्थगित करण्याचा विचार करत नाही. केवळ जीवाला धोका असल्यासारखी गंभीर आणीबाणीची परिस्थिती असेल तरच आम्ही त्यावर विचार करू. त्यांनी सरकारला यावर स्पष्टीकरण देण्यास सांगितले. सरकारच्या वकिलाने खंडपीठाला माहिती दिली की, त्यांना २ जून रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि त्यांची प्रकृती उत्तम आहे.

आसाराम यांचे प्रतिनिधित्व करणारे दामा शेषाद्री नायडू यांनी सांगितले की, ते ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे असून अनेक आजारांनी त्रस्त आहेत. नायडू यांनी दावा केला की, याचिकाकर्ते 'सोशल मीडिया ट्रायल'चे बळी आहेत. पीडितेच्या वकिलाने हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि निर्दशनास आणून दिले की, या प्रकरणात अल्पवयीन पीडितांचाही समावेश आहे.

आसाराम यांनी २०१३ च्या बलात्कार प्रकरणात त्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावणाऱ्या राजस्थान उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत आसाराम यांनी अंतरिम जामिनाचीही मागणी केली आहे.

**उच्च न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली**

मे महिन्यातील आपल्या निकालात, राजस्थान उच्च न्यायालयाने आसारामला सामूहिक बलात्कार आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्याच्या काही तरतुदींनुसार निर्दोष मुक्त केले, तसेच त्याच्या सहआरोपींनाही निर्दोष ठरवले. मात्र, बलात्कार प्रकरणात त्याच्या गुन्हेगारीचे ठोस पुरावे असल्याचे सांगून, न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने दिलेली जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली.

## 'पोलीस आपल्या सोसायटीमध्ये' उपक्रमाला १५ दिवस पूर्ण; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वास, संवाद व सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पोलीस आपल्या सोसायटीमध्ये या अभिनव उपक्रमाला १५ दिवस पूर्ण झाले असून, या उपक्रमाला नागरिकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. दि. १५ जून २०२६ पासून सुरू झालेला हा उपक्रम शहरी भागातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या त्यांच्या परिसरात जाऊन जाणून घेण्यासाठी आणि त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी राबविण्यात येत आहे.



या उपक्रमांतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार नियोजित वेळापत्रकानुसार विविध सोसायट्या, कॉलनी व निवासी परिसरांना भेट देत आहेत. पोलीस आपल्या परिसरात येत असल्याने नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून, वाहतूक, कायदा व सुव्यवस्था, महिला सुरक्षा, सायबर फसवणूक, व्यसनमुक्ती, अवैध धंदे, रात्रीची गस्त, सीसीटीव्ही, पार्किंग तसेच इतर स्थानिक प्रश्न पोलीस प्रशासनासमोर थेट मांडत आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांनी पोलिसांच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत सकारात्मक सूचना व अपेक्षाही व्यक्त केल्या आहेत.

भेटीदरम्यान नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण, दामिनी पथकाच्या सेवा, डायल ११२ आपत्कालीन सेवा, पेट्रोलिंग दरम्यान पोलीस क्यूआर कोडचा वापर , तसेच नवीन फौजदारी कायद्यांनुसार ६० व ९० दिवसांच्या कालमर्यादेत तपास पूर्ण करण्याची तरतूद याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता वाढत असून पोलीस यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.

या उपक्रमामुळे पोलीस व नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी झाला असून, समस्या तातडीने समजून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये हा उपक्रम लोकाभिमुख, विश्वासार्ह आणि काळाची गरज असल्याची भावना निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी नागरिकांनी हा उपक्रम नियमितपणे सुरू ठेवण्याची मागणीही केली आहे.

## १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना 'एचएसआरपी' प्लेट नसल्यास १ जुलैपासून होणार दंडात्मक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी आता ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीनंतर, म्हणजेच १ जुलै २०२६ पासून नियम न पाळणाऱ्या वाहनधारकांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

ज्या वाहनधारकांनी आपल्या वाहनांना अद्याप एचएसआरपी प्लेट बसवलेली नाही, अशा वाहनांच्या विविध शासकीय कामांवर परिवहन विभागाने निर्बंध लादले आहेत. त्यानुसार वाहन हस्तांतरण, पत्ता बदल करणे, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात



बदल करणे आणि परवाना नूतनीकरण यांसारखी सर्व महत्त्वाची कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) आता पूर्णपणे थांबविण्यात येत आहेत. तसेच १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी प्लेट नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १७७ नुसार थेट दंडात्मक कारवाई केली जाईल.

ज्या वाहनधारकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी ऑनलाइन किंवा आगाऊ नोंदणी केली आहे, अशा वाहनांना या कारवाईतून तात्पुरती सूट देण्यात येणार आहे. तरी १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या आपल्या वाहनांचे कोणतेही शासकीय काम अडकू नये आणि दंडात्मक कारवाई टाळता यावी, यासाठी अधिकृत फिटमेंट सेंटरकडून लवकरात लवकर एचएसआरपी प्लेट बसविण्याची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### प्रभात किरणे

जे विसरतात,विसरायला शिकाव
जे टाळतात,टाळायला शिकाव
जे जळतात,विजवायला शिकाव
जे जीव लावतात,जपायला शिकाव

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**पुढील वर्षापासून ऑनलाईन TET परीक्षा -**

### चिमटा दयाचा



थोड्याशा पावसाच्या सरीने
सरकारी कार्यालय
गळू लागले!
हे पाहून जनतेला
आश्चर्य वाटू लागले!!

## बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सदिच्छा भेट



**औसा/प्रतिनिधी:** विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांनी आमदार अभिमन्यू पवार यांच्यासमवेत महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून बसवराज पाटील यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीचा घटक पक्ष म्हणून दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. तसेच महायुतीतील समन्वय अधिक बळकट करण्याबाबतही चर्चा झाली.यावेळी राज्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक प्रश्न, सर्वसामान्यांच्या लोकहिताच्या विषयांसह विकासाभिमुख धोरणे आणि विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी परस्पर सहकार्याने काम करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी माजी मंत्री आ. संजय बनसोडे तसेच शरण पाटील हेही उपस्थित होते. सदिच्छा भेटीमुळे महायुतीतील समन्वय आणि विकासाच्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## उदगीर ग्रामीण पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

### ३ लाख ७३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी ताब्यात

**उदगीर/प्रतिनिधी:** पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत उदगीर ग्रामीण पोलिसांनी जुगार अड्ड्यावर धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत ३ लाख ७३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले, तर चार आरोपी अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून फरार झाले आहेत.

दि. २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ८.०० वाजण्याच्या सुमारास जळकोट रोड, इंडिया नगर, उदगीर येथील एका हॉस्पिटलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगत झागीरदार यांच्या शेताजवळील पत्र्याच्या शेडमध्ये काही व्यक्ती 'तीरट' नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार उदगीर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला.

छाप्यामध्ये १)वसीम दस्तगीर शेख (वय २५, रा. हावगीस्वामी मठ चौक, उदगीर) व २)आमेर बशीर हाश्मी (वय ३२, रा. दर्गा चौक, उदगीर) हे जुगार खेळताना रंगेहाथ मिळून आले. तर ३)शकील राजमहम्मद लदाफ, ४) बबलू खाँजा सय्यद, ५) खाँजा युसुफ शेख ६)आशपाक बारी पटेल हे चार आरोपी पोलिसांची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून फरार झाले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगाराचे साहित्य, ४ मोटारसायकली, ३ मोबाईल फोन, १ ऑटो रिक्षा आणि रोख रक्कम असा एकूण ३,७३,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ४४३/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अमलदार केंद्रे हे करीत असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. त्यांच्या अटकेसाठी पोलिसांकडून शोधमोहीम सुरू आहे.

## महाराष्ट्र सुवर्ण परिवाराचा मोफत सामुदायिक व्रतबंध सोहळा संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी:** उपनयन संस्कार हा जीवनातील एक महत्त्वाचा संस्कार आहे. रत्नाकर वेदपाठक यांच्या पुढाकारातून आयोजित मोफत सामुदायिक उपनयन हा कार्यक्रम निश्चितच कौतुकास्पद व अनुकरणीय असल्याचे मत राज्याचे सेवानिवृत्त पोलीस महानिरीक्षक डॉ. शहाजी सोळुंके सर यांनी व्यक्त केले. शुक्रवारी दिनांक २६ जून २०२६ रोजी पंढरपूर मध्ये श्रीराम मंगल कार्यालयात हा सामुदायिक मोफत उपनयन कार्यक्रम पार पडला तसेच सुवर्णकार समाजातील मान्यवर व गुणवंतांचा सत्कार समारंभ ही झाला या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शहाजी सोळुंके बोलत होते. व्यासपीठावर पोलीस महानिरीक्षक डॉ. शहाजी सोळुंके, महाराष्ट्र सुवर्ण परिवारचे प्रवर्तक संस्थापक रत्नाकर वेदपाठक, कोल्हापूरचे नारायण पोतदार, मोहोळचे प्रसिद्ध सराफ महेश काका पंडित, इंदापूरचे संजय बनकर, फलटणच्या माजी शिक्षणाधिकारी सौ.लताताई दीक्षित, तासगावच्या डॉ.कोमल दीक्षित, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक सिद्धेश्वर बंडगर, ह भ प. अण्णा महाराज भुसनर, मनोज कासेगावकर, संजय वेदपाठक उपस्थित होते. सकाळी १० वाजता ११ बटूंचा संस्कार विधी मोठ्या धार्मिक मंगलमय वातावरणात शेकडो समाज बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तदनंतर संत नरहरी विकास महामंडळचे शासकीय अधिकारी श्री.अमित येरगुंटला यांनी व्यावसायिक समाज बांधवांसाठी विविध शासकीय कर्ज योजनेची माहिती दिली. गणेश गोडबोले महामुनी यांच्या स्वरांजली आर्केस्ट्रा च्या कार्यक्रमाने उपस्थित आमचे मनोरंजन झाले. सुवर्णकार समाजातील विविध जिल्ह्यातून आलेल्या समाज बांधवांची उपस्थिती लक्षणीय होती. शेवटी समाजातील मान्यवरांच्या सत्कार समारंभ नंतर कार्यक्रम यशस्वीरित्या संपल्याचे जाहीर झाले व उपस्थित सर्व समाज बांधव भगिनींचे सारंग व श्रीराज वेदपाठक यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम अतिशय सुंदर व छान झाल्याचे प्रतिक्रिया अनेक उपस्थित त्यांनी नंतर व्यक्त केले.

## पहिल्या पावसात नालीचे पाणी रस्त्यावर



**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील रेणापूर रस्त्यावरील शारदानगर (अंबा हनुमान) भागातील जिजामाता आरोग्यालयासमोर रस्ता तयार करण्यात आला आहे. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजू उंच असल्याने पावसाचे आणि सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. पादचारी आणि वाहनधारकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. प्रशासनाने या समस्येकडे लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

